| अ क्र | विषय | कमाल गुण | संकलित करावयाची माहिती | अभियानाच्या सुरुवातीची दिनांक २ ऑक्टोबरची स्थिती | अभियांन कालावधीतील दि. २० जून पर्यंतवी स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| | केंद्रशासन घनकचरा नियमांची समयबध्द अंमलबजावणी | ४० | १. शहरात निर्माण होणारा एकूण घनकचरा (जैविक व इतर कचरा) | नं.१ शहरात निर्माण होणार एकूण घनकचरा ११५०-१२५० मेट. टन / प्रतिदिन त्यापैकी १) जैविक (बायोमेडीकल ) = १-१.२ मे. टन<br>२) विघटन (बायोडिग्रेबल ) ५१-५५%<br>अविघटनशील<br>( नॉनबायोडिग्रेबल ) ४५-५०% | |
| | | | २. शहरात निर्माण होणा-या घनकच-यापॅकी किती टक्के कचरा नियमित उचलला जातो | ८०-८५% | |
| | | | ३. कचरा गोळा करण्याची पध्दती | **प्राथमिक स्तर**<br>घरोघरचा कचरा गोळा करणे कामी रॅगपिकर्स (एकूण १४४०) मार्फत सायकल रिक्षा (एकूण ७००) द्वारे गोळा केला जातो. घंटाट्रक (एकूण ८०) खाजगी ट्रॅक्टर , टेंम्पो ( एकूण २०)<br>**द्वितीय स्तर**<br>३.८ क्षमतेचे ९७५ कंटेनर ५५ डंपर प्लेसमार्फत व ४५० कॉम्पॅक्टर बकेट ३४ कॉम्पॅक्टर मार्फत २१ हॉटेल वेस्ट गाडया मार्फत - २२०० हॉटेल्स् मधून कचरा गोळा करण्यात येतो. एकूण मिळकतीपैकी ६०% मिळकतीमधून घरोघरी कचरा गोळा करण्याची सेवा मनपामार्फत पुरविली जाते. | |
| | | | ४. घनकच-याची वाहतूक | घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० प्रमाणे घनकच-याची वाहतूक बंदिस्त गाडयामार्फत केली जाते. ( बंदिस्त घंटाट्रक व कॉम्पॅक्टर ) व इतर गाडयांवर ताडपत्रीचे आच्छादन टाकून कचरा वाहतूक करण्यात येते बीआरसी = ४५ ; कॉम्पॅक्टर =३४ | |
| | | | ५. कच-यावरील प्रक्रीया व त्याची सुरक्षित विल्हेवाट | कचरा हंस्तारण केंद्र व लॅन्डफिल साईट येथे दैनंदिन इ.एम. सोल्युशनचा वापर करण्यात येतो. इ.एम. सोल्युशन वापरामुळे कच-याचे विघटन जलद होऊन दुर्गंधी , माशा व किटक यांचा | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रार्दुभाव कमी होण्यास मदत होते | |
| | | | ६. स्वतंत्र लँडफिल साईट त्यांचे शहरापासूनचे अंतर व त्याचे तंत्रशुध्द व्यवस्थापन | शहरापासून अंतर २० कि.मी. व एकूण जागा १६० एकर लॅन्डफिलच्या तंत्रशुध्द व्यवस्थापना अंतर्गत शास्त्रोक्त पदधतीने ४०००० चौ.मी. जागेचे कॅपिंग करण्यात आले असनू, एकूण ७ एकर क्षेत्रावर GEOMEMBRANE करून सिमेंट कॉक्रींट प्लॅटफॉर्म तयार करण्यात आलेला आहे. लिचेट कलेक्शन टँक कार्यान्वित करण्यात आलेले आहे. | |
| | | | ७. लॅडफिलसाईट वर येणा-या कच-याचे स्वरुप (मिश्र, अजैविक, नॉन रिसायकलेबल) | मिश्र | |
| | | | ८. घनकचरा व्यवस्थापन (संकलन व प्रक्रीया) पध्दती सक्षम अणि घनकचरा व्यवस्थापन नियमाशी सुसंगत आहे काय | होय | |
| | | | ९. नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० आधि महाराष्ट्र अजैविक कचरा नियंत्रण अधि नियम २००६ चा भंग करणा-या व्यक्ती, संस्था, इ वर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे काय | होय | |
| | | | १०. जैविक कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९८ ची अंमलबजावणी | जैविक कचरा ( बायोमेडीकल वेस्ट ) हे स्वतंत्रपणे बी.ओ.टी. तत्वावर हॉस्पीटल (खाजगी, सरकारी ,निमसरकारी ) ब्लडबँक , खाजगी दवाखाने यांचकडून दैनंदिन १ ते १.२ टन कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट इनसिनरेटर मध्ये करण्यात येते. | |
| २ | प्रक्रीया | २० | 1. Composting & Capacity | ४० टन | |
| | | | 2. Vermi Composting & Capacity | | |
| | | | 3. Insineration & Capacity | ५ टन | |
| | | | 4. Gasification & Capacity | १२ टन | |
| | | | 5. Power Generation & Capacity | ३ टन | |
| ३ | आर्थिक व्य वस्थापन | १५ | १. आस्थापना खर्च | ६० कोटी | |
| | | | २. खर्च ताळमेळ (स्वतंत्रपणे ठेवला जातो काय) | होय | |
| | | | ३. सेवाशुल्क आकारणी व त्यांची वसूली इ. बाबी | ३० लाख | |
| | | | ४. खर्च कमी करण्यासाठी | अ) शहरातील काही मुख्य | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | केलेल्या उपाययोजना | रस्त्यांचे झाडणकाम बी.ओ.टी तत्वावर करण्यात येते. ब) पुणे शहरात विके द्रिकरण पदधतीने कचरा हस्तांतरण केंद्र कार्यान्वित करण्यात आल्यामुळे वाहतुक खर्चात बचत झालेली आहे. क) सर्व हस्तातरण केंद्रवर वॉकीटॉकी देण्यात आल्यामुळे संपर्कात राहिल्यामुळे त्रुटी दुर होऊन कामात गतिमानता आली आहे व वाहनांच्या नादुरुस्तीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. | |
| ४ | प्लॅस्टिक वापर बंदी, प्रभावीपणा, अंमलबजावणी, दंडात्मक कारवाई इ. | ५ | १. शहरात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॉस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घातली आहे काय | होय | |
| | | | २. दंडात्मक कारवायांची संख्या | ५५ | |
| | | | ३. जप्त करण्यात आलेल्या मालाचे मूल्य | रु.२००००/- | |
| | | | ४. प्लॅस्टिक पिशव्या (उत्पादन व वापर) अधिनियम २००६ ची अंमलबजावणी | अंमलबजावणी चालू आहे. | |
| | | | ५. या अधिनियमाचा भंग करणान्यावर करण्यात आलेली दंडात्मक कारवाई व त्याची परिणामकारकता | उपद्रवशोध पथकास मायक्रोमिटर देण्यात आलेले असून, २० मायक्रॉन पेक्षा कमी प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर बंद करण्यात आला आहे. | |
| ५ | घनकचरा व्यवस्थापनात काही नाविन्यपूर्ण बाबी | १० | १. स्त्रोताच्या ठिकाणी कचरा कमी करण्यासाठी केलेले उपाय | १. सन २००० नंतर पूर्णत्वास आलेल्या सर्व बांधकामांना ओला कचरा शास्त्रोक्त पदधतीने व्यवस्थापन करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सुमारे ४० मे. टन प्रतिदिन कचरा जिरविला जातो. | |
| | | | २. घनकचरा व्यवस्थापन व अशासकीय संस्थाचा सहभाग / सीबीओ मार्फत लोकसहभाग | घनकचरा व्यवस्थापनात अशासकीय संस्थाचा सहभाग अनेक शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्थाचा सहभाग घेऊन ओल्या कच-याचे वर्गीकरण व गांडूळखत /बायो सॅनिटायझर बायोगॅस प्रकल्प करण्यात आलेले आहेत.२. कर्मशिअल वेस्ट जनरेटर उदा. पंचतारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट मंगल कार्यालयाचे क्लब यांना ओला कचरा जिरविण्यासाठी प्रोस्ताहित करून अनेक प्रकल्प त्यांनी स्वखर्चाने उभारले आहेत.३. पुणे मनपाच्या मान्यता प्राप्त रॅगपिकर्स | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | संस्थांच्या मदतीने रोज सुमारे ३०० मे. टन प्रतिदिन सुका कचरा पुर्ननिर्मीतीसाठी पाठविण्यात येत आहे. ४. रॅगपिकर्सच्या संस्थाना प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात सॉर्टिंग शेड बांधून देण्यात आलेल्या आहेत. ५. रॅगपिकर्ससाठी ६ लाख रू. इतकी विमा रक्कम पुणे मनपाने दिली आहे. ६. रॅगपिकर्स संस्थाना मुलभुत सुविधा उदा. सायकल रिक्षा हातगाडे पुरविण्यात आले आहेत. | |
| | | | ३. आधुनिक तंत्रज्ञानाचा विशेष वापर व इतर विशेष बाबी असल्यास | ५०० मे. टन ओल्या कच-यासाठी प्रकल्प देवाची ऊरूळी येथे कार्यान्वित करण्यात आलेला आहे. मुख्य रस्त्यांच्या सफाईसाठी दोन मॅकॉनिकल स्वीपर मशिनचा वापर करण्यात येणार आहे. | |
| ६ | ग्राहक समाधान अहवाल | १० | १. या संदर्भात नागरिकांचे सर्वेक्षण केले आहे काय | होय | |
| | | | २. असल्यास किती लोकांचे केले आहे | १०% | |
| | | | ३. त्यापैकी किती नागरिक याबाबत समाधानी आढळून आले | ७ ते ८ % | |
| | | | ४. असमाधानी नागरिकांच्या तक्रारीच्या निवारणाकरीता करण्यात आलेल्या /येत असलेल्या उपाययोजना | १. नागरिकांच्या तक्रारीसाठी प्रत्येक आरोग्यकोठीवर तक्रार रजिस्टर ठेवण्यात आलेले आहे.<br>२. नागरिकांना एस.एम. एस. द्वारे आरोग्य निरीक्षक विभागीय आरोग्य निरीक्षक, क्षेत्रिय अधिकारी यांना तक्रारी करण्यात येतात व त्यांचे त्वरीत निवारण करण्यात येते.<br>३. महिन्याच्या दर गुरूवारी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात मोहल्ला कमिटी व इतर सामाजिक संस्थांच्या मिटींग घेऊन तक्रार निवारण करण्यात येते<br>४. नॅशनल सोसायटी फॉर क्लीन सिटी यांची दर महिन्याला मनपा भवन येथे मिटींग घेण्यात येऊन तक्रार निवारण केले जाते<br>५. कच-याचे वर्गीकरण व शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी नागरीकांच्या वॉर्डस्तरावर नियमितपणे मिटींग घेण्यात येतात. शाळा व कॉलेजमध्ये पथनाटय, पपेट शो, रॅलीजचे आयोजन | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | करण्यात येते व प्रबोधन करण्यात येते. झोपडपट्टीमध्ये पोस्टर्स बॅनर्स व प्रबोधनात्मक सी.डी.चा वापरण्यात येतो. | |
| | एकुण गुण | १०० | | | |

उप आयुक्त कार्यालय
(घनकचरा व्यवस्थापन)
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.
दिनांक :-

प्रति,
मा. सह आयुक्त (मुख्य लेखापाल) तथा सदस्य सचिव,
संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान
पुणे महानगरपालिका.
यांजकडे

विषय : संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान सन २००७-०८ अहवाल

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान सन २००७-०८ स्पर्धेचे कार्यवाहीबाबत खात्याचा अहवाल सोबत जोडून पाठवित आहोत.

मा.स.कळावे.

उप आयुक्त
(घनकचरा व्यवस्थापन)
पुणे महानगरपालिका

सोबत : सीडी